# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय,लातूर.

**ग्राहक तक्रार क्रमांक** : ०३/२०१८
**ग्राहक तक्रार दाखल दिनांक** : १२.०१.२०१८

**सौ. भारतबाई माधवराव कळसे**
**श्री कृष्ण नगर लातूर.** **-- ग्राहक अर्जदार**

**-- विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
**अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, लातूर** **-- गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम :** | **श्री.माणिक व्ही.येवतीकर** | **अध्यक्ष** |
| | **श्री.आर. जी. कोलप** | **सदस्य/सचीव** |

## निकाल **दि. २०.०३.२०१८**

ग्राहक अर्जदार, सौ.भारतबाई माधवराव कळसे, श्री कृष्ण नगर लातूर. यांनी त्यांची तक्रार अ फॉर्ममध्ये दि. १२.०१.२०१८ रोजी ग्राहक प्रतिनिधी श्री. शरद कुलकर्णी लातूर यांच्यामार्फत मंचामध्ये दाखल केली आहे.

ग्राहक प्रतिनिधीचे गाऱ्हाणे/तक्रार असे आहे की, ग्राहक क्र. ६१०५५०२६३२२२ सौ. भारतबाई माधवराव कळसे यांचे मीटर जंप झाल्यामुळे ६२२ युनिट चे बिल रु. ६५८२/- आले आहे व ते पूर्णतः चुकीचे आहे. ते P-com/Accts/Biling/041037 Commerical Circular No.254 Dt.07.12.2015. नुसार दुरुस्त करुन मिळावे. तसेच सदर ग्राहकाचे मीटर हे Rolex कंपनीचे असुन ते मुख्य अभियंता MMC प्रकाशगड बांद्रा यांचे पत्र क्र. ७७८ दि.०९.०३.२०१६. नुसार ताबडतोब बदलुन देण्यात यावे. जोडभारा प्रमाणेच प्रत्येक महिन्याला रिडींग आली पाहिजे असा समज करून घेवुन देवुन बिल दुरुस्ती केली आहे ती मान्य नाही. तसेच IGRC लातूर यांचा दि.०३.०१.२०१८ रोजीचा निकाल रद्द करावा. अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष लातूर व ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर यांची दिशाभुल केल्याबद्दल संबधीत अधिकाऱ्यास समज देण्यात यावी.

ग्राहक अर्जदाराची छअद फॉर्ममधील तक्रार प्राप्त झाल्यानंतर गैरअर्जदार/महावितरण कंपनी यांना त्यांचे लेखी म्हणणे देण्याविषयी पत्र क्र. EE/CGRF/LTR/152 दि. १२.०१.२०१८ दिले होते. त्यास महावितरणतर्फे अति.काअ/उवि(द)लातूर/तां/१७४ दि. २५.०१.२०१८ नुसार खुलासा सादर करण्यात आला.

दि. २०.०२.२०१८ रोजी सुनावणीमध्ये गैरअर्जदार महावितरणतर्फे श्री एस. आर. कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, मंडल कार्यालय, लातूर तसेच श्री. राजाभाऊ वडणे, अति.कार्यकारी अभियंता दक्षिण उपविभाग लातूर हे हजर होते. त्यांनी आपली बाजू मांडताना सांगितले की, सप्टेंबर २०१७ चे बील ६२२ युनीटचे रु. ६५८२/- दिले